J.O



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** दहीवडी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0121 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/06/2019 03:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 28/06/2019

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/06/2019

**Time From (वेळेपासून):** 17:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 03:22 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/06/2019 **Time (वेळ):** 03:22 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/06/2019 03:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** दहिवडी ते मलवडी जाणारे रोडवरील,दहिवडी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुरज आनंदा शिंदे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1989 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोराळे,दहीवडी,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोराळे,दहीवडी,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय शिवाजी वाघमारे | | | 1. कुकुडवाड,दहीवडी,सातारा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

खबरी जबाब दिनांक 29/06/2019मी, सुरज आनंदा शिंदे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती, मुळ रा. मोराळे ता. खटाव जि. सातारा सध्या रा. वडजल ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर 9765168711/ 8007461945समक्ष दहिवडी पोलीस स्टेशनमध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, मी वडजल ता. माण या ठिकाणी मी माझा लहान भाऊ अमोल, तसेच माझी पत्नी यांचे समवेत राहण्यास आहे. मी मौजे कुकुडवाड ता.माण जि.सातारा येथील गट नं. 975 मधील 29 गुंठे क्षेत्र शेतजमीन सन 2014 मध्ये खरेदी केली होती. त्यानंतर आमच्या भावांच्या सोईसाठी सदरची जमीन मी माझा लहान भाऊ यांचे नावावर केली असुन त्याचा रितसर दस्त दुय्यम निंबंधक दहिवडी यांच्याकडे केला असुन त्याचा क्रमांक 796/2019 असा आहे. त्यानंतर माझ्या भावाने मागील तीन महिन्यांपुर्वी कुकुडवाड ता. माण येथील तलाठी कार्यालयात सदर दस्ताची नोंद होवुन तसा 7/12 उतारा मिळणे संबंधाने अर्ज केला होता. माझ्या लहान भावाला कागदपत्रातील जादा काही माहिती नसल्याने त्याने मलाच सदरच्या दस्ताची नोंद करून घे असे सांगितले होते. त्यामुळे सदरचे काम मीच पाहत होतो. सदरच्या कामासाठी मी वारंवार तलाठी कार्यालय कुकुडवाड या ठिकाणी जावुन तलाठी यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला असता माझी व तलाठी यांची भेट झाली नाही. मागील आठवडयात मी तलाठी कार्यालय कुकुडवाड या ठिकाणी गेलो असता त्या ठिकाणी माझी कुकुडवाडचे कोतवाल श्री. विजय वाघमारे यांची तलाठी कार्यालयात भेट झाली. त्यावेळी त्यांनी मला तुमचे काम असेच होणार नाही, त्यासाठी हजार एक रूपये खर्च करावा लागेल, आण्णा साहेब नवीन आहेत त्यांना भेटायची काय अवश्यकता नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना एवढे पैसे कशाला लागत्यात असे विचारले असता त्यांनी त्या शिवाय तुमचे नोंदीचे काम होणार नाही, तुम्ही माझी दहिवडी कचेरीत येवुन शुक्रवार दिनांक 28/06/2019 रोजी भेट घ्या असे सांगितले. त्यावर मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो.त्यानंतर मी, श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक, न्टी करप्शन ब्युरो सातारा यांना फोन करुन मौजे कुकुडवाड ता.माण येथील कोतवाल विजय वाघमारे हे लाच मागणी करत असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 28/06/2019 रोजी दहिवडीचे अलीकडे येवुन थांबण्याची सुचना दिली त्याप्रमाणे मी दहिवडीचे अलीकडे येवुन थांबुन राहीलो.त्यानंतर श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी दिनांक 28/06/2019 रोजी माझ्याशी संपर्क साधुन मला आर्या हटेलच्या मागे दहिवडी ते तुपेवाडी जाणारे रोडवर येण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी त्या ठिकाणी गेलो. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, त्याचे सापळा पथकासह खाजगी वाहनासह हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व धोम पाटबंधारे उपविभाग, कोरेगाव, कार्यालयातील 1) राजेशा अमीन काझी, कालवा निरीक्षक व 2) विठ्ठल महादेव सणस, मोजणीदार या दोन पंचांसह, सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझा तक्रारी अर्ज शिर्के साहेबांकडे हजर केला. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचण करुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे कुकुडवाड ता.माण येथील कोतवाल विजय वाघमारे यांनी माझ्याकडे लाच मागणी केली अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन काझी व पंच नं. 2 म्हणुन सणस यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी

ठरवुन मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने कोतवाल विजय वाघमारे यांची भेट घेण्यासाठी पाठवुन पडताळणी केली असता त्यामध्ये कोतवाल विजय वाघमारे यांची माझ्याशी समक्ष भेट झाली. त्यावेळी कोतवाल वाघमारे यांनी माझ्याकडे, माझ्या भावाने मौजे कुकुडवाड ता.माण जि.सातारा येथील गट नं. 975 मधील 29 गुंठे क्षेत्र शेतजमीन खरेदी केले दस्ताची नोंद करुन तसा 7/12 उतारा मिळवुन देण्यासाठी 1000/- रुपयांची लाच मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 1000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्या दुचाकी वाहनावरुन कोतवाल विजय वाघमारे यांची भेट घेण्याकामी दहिवडी तहसिल कार्यालय येथे रवाना केले. शिर्के साहेब व सापळा पथक आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन खाजगी वाहनाने आले. मी व पंच नं. 1 असे आपले सुचनेप्रमाणे व माझ्या माहिती प्रमाणे माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन दहिवडी तहसिल कार्यालयाचे बाहेर गेलो. आमच्या पाठोपाठ आपण देखील आपल्याकडील वाहनाने आलात. त्यावेळी मी माझ्या मोबाईलवरून कोतवाल वाघमारे यांना फोन करून कुठ आहे असे विचारले. कचेरीच्या बाहेरच कोतवाल वाघमारे हे थांबले होते त्या ठिकाणी जावुन मी दुचाकी थांबवली. त्यानंतर मी, चहा पाणी काय घ्यायचं का असे कोतवाल वाघमारे यांना विचारले असता त्यांनी बर चला चहा पाजतो असे म्हणुन त्यांच्या सोबत असलेल्या इसमाच्या दुचाकीच्या पाठीमागे बसले. त्या इसमाने त्यांची दुचाकी दहिवडी तहसिल कार्यालयाचे समोरून दहिवडी शहराकडे घेतली. मीही माझी गाडी त्यांच्या पाठोपाठ घेतली. आमच्या पाठोपाठ आपण देखील आलात. त्यावेळी कोतवाल वाघमारे यांनी त्यांच्या मित्राला दुचाकी हटेल राजेवाली बाबा यां ठिकाणी थांबविण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी देखील माझी दुचाकी हटेल राजेवाली बाबाचे समोर पार्क केली. त्यावेळी कोतवाल वाघमारे व त्यांचे सोबतचा एक इसम हटेलचे बाहेरच असले टेबलाजवळील खुर्चीवर जावुन बसले. मी ही त्यांचे पाठोपाठ जावुन त्यांचे समोरील खुर्चीवर जावुन बसले. त्यावेळी पंच नं. 1 आमचेपासुन थोडे बाजुलाच थांबुन राहिले. त्यावेळी कोतवाल वाघमारे यांनी हटेलमध्ये दोन चहाची ऑर्डर दिली. चहा आल्यांनंतर आम्ही चहा घेतला. त्यावेळी कोतवाल वाघमारे यांनी माझ्याकडे पाहुन त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा केला. तो पाहुन मी माझ्या शर्टच्या छातीवरील डावे बाजुचे खिशात अंथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली 1000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन कोतवाल वाघमारे यांचे समोर धरली व हाजार हायती, बघा ही, एक हजार बरोबर हायत, काम होणार असल तर सांगा असे म्हणालो. त्यावेळी कोतवाल वाघमारे यांनी ती लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून न मोजता त्यांच्या शर्टच्या छातीवरील डावे बाजुस असले खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी व कोतवाल वाघमारे आमचे दुकानासंबंधाने तसेच नविन तलाठी यांच्या संबंधाने बोलणे केले. त्यावेळी मी, खुर्चीवर बसुनच माझा डावा हात दोन वेळा डोक्यावरून फिरवून लाच रक्कम स्विकारलेचा पुर्व नियोजित इशारा केला. तो इशारा पाहून श्री.शिर्के, पंच नं.2 व सापळा पथक असे सर्वजण माझ्या जवळ आले. श्री. शिर्के साहेबांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढून घेवून तो बंद केला. व मला बाजुला थांबणेस सांगुन सर्वजण पंच नं.1 यांचे जवळ गेले. त्यानंतर शिर्के साहेबांनी कोतवाल वाघमारे यांना ताब्यात घेतले.त्यानंतर राजेवली बाबा हटेलमध्ये शिर्केसाहेबांनी पथकाच्या सहाय्याने कोतवाल वाघमारे यांची तपासणी केली. त्यावेळी मला, शिर्के साहेबांच्याकडुन समजले की, कोतवाल वाघमारे यांच्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यांना व तळहातास तसेच त्यांचे शर्टचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आल्याचे सांगितले. त्यानंतर माझी देखील अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील पुढील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिर्के साहेबांनी मला हटेलचे बाहेर थांबण्यास सांगितले.त्यानंतर कोतवाल वाघमारे यांना ताब्यात घेवुन शिर्के साहेब व दोन्ही पंच तसेच सापळा पथक असे खाजगी वाहनाने व माझे कडील वाहन पोक. काटकर यांनी घेवुन त्यांचे सोबत मी, असे आम्ही सर्वजण दहिवडी येथील शासकिय विश्रामगृह येथे गेलो. त्या ठिकाणी शिर्के साहेबांनी मला बाहेर थांबण्यास सांगुन सर्वजण शासकिय विश्रामगृहात गेले. त्यानंतर मला कक्षात बोलावुन घेवुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर शिर्के साहेबांनी, माझे व पंच नं. 1 काझी यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कक्षात बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली. सदरबाबत सविस्तर यशस्वी पंचनामा विश्रामगृह दहिवडी येथे टंकलीखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी दिनांक 28/06/2019 रोजीचे पडताळणी कारवाईमध्ये विजय शिवाजी वाघमारे, वय 29 वर्षे, व्यवसाय नोकरी, कोतवाल, मौजे कुकुडवाड ता.माण जि.सातारा रा. कुकुडवाड ता.माण जि.सातारा यांनी माझ्याकडे, माझ्या भावाने मौजे कुकुडवाड ता.माण जि.सातारा येथील गट नं. 975 मधील 29 गुंठे क्षेत्र शेतजमीन खरेदी केले दस्ताची नोंद करुन तसा 7/12 उतारा मिळवुन देण्यासाठी 1000/- लाच मागणी करुन ती लाच रक्कम सापळा करावाईमध्ये दहिवडी ते मलवडी जाणारे रोडवरील राजेवली बाबा हटेलचे समोर 17.10 वाजण्याचे सुमारास माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.      ही खबर दिली

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** **or**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे pramod rajendra dixit **Rank (**पद**):** SI (Sub-Inspector)

**No.(**क्र.**):** psi **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): pravin sahjerao patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): api

पोलीस स्टेशन ऑफीसर
दहिवडी पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)